**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/८१/२०२४

दिनांक - ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. दादासो महादेव गायकवाड

रा. लवंगा, ता. जत, जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सदाशिव विठोबा चव्हाण

रा.लवंगा ता.जत जि.सांगली ..... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे लवंगा, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ८६० या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,उमदी यांनी फेरफार नंबर ८६०, दिनांक २८.०२.२००९, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे लवंगा, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ८६० या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,उमदी यांनी फेरफार नंबर ८६०, दिनांक २८.०२.२००९, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे. प्रस्तूतचे अपिल दाखल करणेस अपिलार्थी यांना जवळपास १४ वर्षे ०७ महिने इतका विलंब झालेला आहे. त्याकामी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केला आहे.

२. प्रकरणातील फेरफार नंबर ८६० पाहता अपिलार्थी यांनी जाबदार यांचेकडून नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.२५८२, दिनांक ३०.०७.२००८ ने वाद मिळकत गट नंबर २८/२ मधील २.६१ हे.आर व पोटखराब ०.०२ हे.आर क्षेत्र खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदी दस्ताची नोंद फेरफार क्र.८६० ने धरणेत येवून मंडळ अधिकारी यांनी " इतर वारसांची मान्यता नाही सबब नोंद रद्द " असा शेरा नमूद करून नोंद रद्द केलेली आहे. वाद मिळकतीच्या अधिकार अभिलेखाचे अवलोन करता इतर हक्कात फुलाबाई

राऊ यादव (३२९) व धुरपाबाई विठोबा चव्हाण (३२९) यांची नांवे इतर हक्कात दिसून येत आहेत. त्याची संमती/ मान्यता खरेदी दस्ताचे वेळी घेतलेचे दिसून येत नाही. त्यामुळे मंडळ अधिकारी यांनी वादातीतीत फेरफार प्रकरणी दिलेला निर्णय योग्य व न्याय आहे.

३. मुळात अपिलार्थी यांनी १४ वर्षे ०७ महिने इतक्या विलंबाने दाखल केलेले अपील कोणत्याही वैध कारणाशिवाय विलंब माफ करता येणार नाही. तसेच विलंब माफ करणेकामी कोणतेही संयुक्तिक कारण अपिलार्थी यांनी दिलेले नाही त्यामुळे विलंब माफ करता येणार नाही. अपिलार्थी यांचे अपील विलंबाचे मुद्दयावर फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

उप विभागीय अधिकारी जत उपविभाग, जत

( अजयकुमार नष्टे )
उपविभागीय अधिकारी
जत उपविभाग जत

ठिकाण - जत
दिनांक - ३१.०१.२०२५

प्रत - अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.